# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:30.03.2026** **वार: सोमवार**

1. पश्चिम आशियातल्या संघर्षामुळे निर्माण झालेल्या आव्हानांना एकजुटीनं सामोरं जाण्याचं पंतप्रधानांचं मन की बातमधून आवाहन
2. देशाची सुरक्षा आणि विकासात पोलीस दलाचं महत्त्वपूर्ण योगदान असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं प्रतिपादन
3. प्रसिद्ध उद्योगपती विजयपत सिंघानिया यांच्या पार्थिवावर मुंबईत अंत्यसंस्कार आणि
4. चौथ्या महिला महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत कोल्हापूरची अमृता पुजारी विजेती

**मन की बात**

पश्चिम आशियातल्या युद्धजन्य परिस्थितीमुळं जागतिक पातळीवर अस्थिरतेचं वातावरण आहे, अशा आव्हानात्मक स्थितीतून आपल्याला एकजुटीनं बाहेर पडायचं आहे, असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. ते काल मन की बात कार्यक्रमाच्या 132 व्या भागात देशवासीयांशी संवाद साधत होते. आपल्या लक्षावधी कुटुंबांचे सगे-सोयरे या आखाती देशांमध्ये राहतात, अशा एक कोटींहून अधिक भारतीयांना सर्वतोपरी मदत केल्याबद्दल, पंतप्रधान मोदी यांनी आखाती देशांचे आभार मानले. या काळात सर्व देशवासीयांनी जागरूक राहावं, अफवांना बळी पडू नये, असं पंतप्रधान म्हणाले....

**मैं गल्फ कंट्रीज का बहुत आभारी हूं। वह ऐसे एक करोड़ से ज्यादा भारतीयों को वहां पर हर प्रकार की मदद दे रहे हैं, जो लोग इस विषय पर भी राजनीति कर रहे हैं, उन्हें राजनीति नहीं करनी चाहिए यह देश के 140 करोड़ देशवासियों के हित से जोड़ा विषय है। मैं सभी देशवासियों अपील भी करूंगा कि वह जागरूक रहे, बहकावें में ना आए, सरकार की तरफ से जो आपको निरंतर जानकारी दी जा रही है, उस पर भरोसा करें।**

देशाच्या विविध भागात विखुरलेल्या हस्तलिखितांची माहिती एकत्रित करण्यासाठी ज्ञानभारतम् हा प्रकल्प सुरू आहे, यासाठीचं सर्वेक्षण सुरू झालं आहे, याबाबत नागरिकांनी ज्ञानभारतम ॲप वर माहिती कळवावी असं आवाहन पंतप्रधानांनी केलं; ते म्हणाले...

**आज 'मन की बात' में एक ऐसे प्रयास के बारे में बताना चाहता हूं, जो देशवासियों की जनभागीदारी की भावना को दर्शाता है। ये प्रयास है-ज्ञान भारतम सर्वे, जिसका संबंध हमारी महान संस्कृति और समृद्ध विरासत से है। इसका उद्देश्य देशभर में मौजूद manuscripts यानि पांडुलिपियों के बारे में जानकारी जमा करना है। इस सर्वे से जुड़ने का एक माध्यम, ज्ञान भारतम ऐप है।**

माय भारत संघटनेमार्फत देशातल्या तरुणांना अर्थसंकल्पाच्या प्रक्रियेशी आणि धोरणनिर्मितीशी जोडण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या प्रश्नमंजूषेत जवळपास 12 लाख तरुणांनी भाग घेतल्याचं मोदी यांनी सांगितलं. प्रश्नमंजूषेनंतर एक लाख साठ हजार सहभागींना निबंध स्पर्धेसाठी निवडलं गेलं. या निबंधामधून आपल्या कल्पना सर्वांसमोर मांडणाऱ्या सर्व तरुणांचं कौतुक करत देशाला पुढे घेऊन जाण्यासाठी हे विचार अतिशय महत्त्वाचे आहेत, असं पंतप्रधान मोदी यांनी सांगितलं.

भारतीय क्रिकेट संघानं ऐतिहासिक विजय मिळवत टी ट्वेंटी विश्वचषक जिंकला. या यशाचा आपल्या सर्वांना खूप अभिमान वाटतो,असं सांगत जम्मू-काश्मीरच्या क्रिकेट टीमनं रणजी करंडकावर विजय मिळवल्याबद्दल पंतप्रधान मोदी यांनी

विशेष कौतुक केलं. देशाच्या अनेक भागांमध्ये उन्हाळा सुरु झाला आहे, हा काळ जल संरक्षणाच्या आपल्या निश्चयाचा पुनरुच्चार करण्याचा आहे असं सांगत लोकसहभागामुळे जल संरक्षणाच्या कामाची व्याप्ती कशी वाढते हे पंतप्रधानांनी विविध उदाहरणांद्वारे सांगितलं.

**पोलीस ड्युटी-मुख्यमंत्री-नागपुर**

अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळावा हा विविध राज्यांनी विकसित केलेल्या क्षमतांचं आदान प्रदान करण्यासाठी महत्त्वाचा मंच आहे. यामुळं सामूहिकरित्या आपली कार्यक्षमता वाढवण्यासाठी मदत होते, असं मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केलं. नागपूरमध्ये पोलीस मुख्यालयाच्या शिवाजी क्रिडांगणावर आयोजित 69 व्या अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्याचं उद्घाटन काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं. त्यावेळी ते बोलत होते. पोलीस दल एक शिस्तबद्ध विभाग असून देशाच्या विकासात आणि अंतर्गत सुरक्षेत पोलीसांचं योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. कोणत्याही राष्ट्राच्या प्रगतीसाठी कायदा आणि सुव्यवस्था मजबूत असणं अत्यावश्यक आहे आणि ही जबाबदारी पोलीस अत्यंत सक्षमपणे पार पाडतात असे गौरवोद्गार फडणवीस यांनी काढले. या कार्यक्रमाला राज्यमंत्री आशिष जयस्वाल, पोलीस महानिदेशक सदानंद दाते आदी मान्यवर उपस्थित होते.

**नागपूर-अतिक्रमण निर्णय**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकारनं महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, सरकारी जागेवर पंधराशे चौरस फुटांपर्यंत असलेलं अतिक्रमण नियमबद्ध करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. ते काल नागपुरात प्रसार माध्यमांशी बोलत होते.

**भोंदू खरात-नाशिक**

भोंदूबाबा अशोक खरातला नाशिकच्या न्यायालयानं काल पुन्हा तीन दिवसांची पोलीस कोठडी दिली आहे. यापूर्वीची त्याची पोलिस कोठडी संपल्यानंतर नाशिकच्या न्यायालयामध्ये काल त्याला हजर करण्यात आलं होतं. यावेळी न्यायालयानं तीन दिवसाची पोलीस कोठडी वाढवून दिली आहे.

**पंढरपूर**

चैत्र एकादशीचा सोहळा काल पंढरपूरमध्ये मोठ्या उत्साहात पार पडला. जवळ जवळ तीन लाख भविकांनी पांडुरंगाचं दर्शन घेतलं आणि चंद्रभागेमध्ये स्नान केलं.

**रथयात्रा-नाशिक**

शेकडो वर्षाची परंपरा असलेला नाशिकचा श्रीराम रथोत्सव काल उत्साहात साजरा झाला. श्री काळाराम मंदिर देवस्थानच्या वतीने दरवर्षी राम नवमीला राम जन्मोत्सवानंतर कामदा एकादशीला श्रीराम रथोत्सव आयोजित केला जातो. अहिल्याराम व्यायामशाळा आणि रास्ते आखाडा तसंच परंपरेनं स्वीकार मंदिराच्या पूर्व दरवाजा इथून आधी गरुड रथ आणि त्यानंतर श्रीराम रथ भाविकांनी ओढत नेला.

**निधन-सिंघानिया**

प्रसिद्ध उद्योगपती आणि रेमंड उद्योगसमूहाचे माजी प्रमुख विजयपत सिंघानिया यांच्या पार्थिव देहावर काल दुपारी मुंबईच्या स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. सिंघानिया यांचं परवा मुंबईत निधन झालं. ते 88 वर्षांचे होते.लोकरी कपड्याच्या रेमंड या जगप्रसिद्ध ब्रँड बरोबरच पोलाद, सिमेंट, आणि कृत्रिम वस्त्रांच्या उद्योगात सिंघानिया यांनी वेगळं स्थान निर्माण केलं होतं. कारखानदारीबरोबरच वैमानिक म्हणूनही त्यांनी नाव कमावलं होतं. लंडन ते नवी दिल्ली हा प्रवास मायक्रोलाईट विमानातून 23 दिवसात एकट्यानं करण्याचा विक्रम त्यांनी नोंदवला होता. तसंच वयाच्या 67व्या वर्षी गरम हवेच्या बलूनमधून उड्डाण करण्याचा प्रयोगही त्यांनी यशस्वी केला होता. भारतीय वायु दलानं त्यांना मानद एअर कमोडोर पद दिलं

होतं, पद्मभूषण नं सन्मानित सिंघनिया 2006 मध्ये मुंबईचे नगरपाल होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, यांच्यासह इतर मान्यवरांनी सिंघानिया यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

**<u>अपघात-गडचिरोली</u>**

गडचिरोली जिल्ह्यात चामोर्शी-गडचिरोली मार्गावर एक मोटार आणि खासगी बसमध्ये झालेल्या अपघातात पाच जणांचा मृत्यू झाला; तर 11 जण जखमी झाले. जखमींवर गडचिरोली जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

**<u>खेलो इंडिया-आदिवासी</u>**

पहिल्या खेलो इंडिया आदिवासी स्पर्धा छत्तीसगडच्या रायपूरमध्ये सुरू आहेत. या स्पर्धेत महाराष्ट्राकडून यवतमाळच्या साक्षी बुरकुलेने भारोत्तोलनात सुवर्णपदक जिंकून कालचा दिवस गाजवला. 86 किलो गटात 150 किलो वजन पेलून साक्षी बुरकुलेने पदार्पणातच सुवर्ण पदकाला गवसणी घातली. या स्पर्धेत या आधीच नागपूरच्या तन्वी धूर्वे हिने जलतरणात सुवर्णपदक पटकावलं आहे.

**<u>कुस्ती-सोलापूर</u>**

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघानं सोलापूरमध्ये आयोजित केलेल्या चौथ्या महिला महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत कोल्हापूरच्या अमृता पुजारीने विजेतेपद मिळवलं. अंतिम किताबी लढतीत अमृताने कोल्हापूरच्याच वेदिका सासणे हिचा 7-0 अशा फरकाने पराभव केला. महिला कुस्ती स्पर्धेला शासनाचा भक्कम पाठिंबा असल्याचं पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी या स्पर्धेच्या समारोपाच्या कार्यक्रमात सांगितलं.

**<u>हवामान</u>**

राज्याच्या बहुतांश भागात येत्या 2-3 दिवसात पावसाची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात मेघगर्जनेसह पाऊस पडेल; सोसाट्याचे वारे वाहतील; तर काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यताही हवामान विभागानं वर्तवली आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.